http://www.epitomejournals.com Vol. 4, Issue 4, April 2018, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# आपुलाचि वाद आपणासी : काही आकलनाच्या दिशा



**प्रा.डॉ.खंदारे बी.बी.**
विभाग प्रमुख, मराठी
बहिर्जी स्मारक महाविद्यालय,
वसमत जि.हिंगोली

## RESEARCH PAPER

आत्मचरित्र वाड्मयप्रकाराचे स्वरुप आकलन करुन घेण्यासाठी त्यांचे स्वरुप विशेष आकलन करुन घेणे क्रमप्राप्त आहे. या वाड्मयप्रकाराच्या वाड्मयीन प्रदीर्घ परंपरेचा इतिहास आपल्यापुढे ठेवणार नाही, ना त्यांची स्वरुप मीमांसाही करणार नाही. मी फक्त या आत्मचरित्राच्या आकलना संदर्भात काही दिशा इथे नोंदवण्याचा प्रयत्न करणार आहे. त्याआधारे विद्यार्थ्यांना आत्मचरित्र या कथात्मक वाड्:मयीन प्रकाराचे आकलन होईल.

तत्पुर्वी प्रा.डॉ.वा.ल.कुलकर्णी यांनी आत्मचरित्र वाड्:मय प्रकारासंबंधी काय म्हटले ते इथे ठेवतो ते मला ‘आपुला चि वाद आपणासी’ अभ्यासण्यासाठी महत्वाचे वाटते.

वा.ल.कुलकर्णी असे म्हणतात- “चरित्र लेखन हा चरित्र विषयाच्या जीवनाचा सर्व बारीक-सारीक तपशील गोळा करुन त्यातून त्याचे जीवनचित्र तयार करीत

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR All rights reserved.

असतो, येथे ज्या जीवनाचे चित्रे रेखाटावयाचे असते ते स्वत:चेच जीवन असल्यामुळे त्याचा तपशील गोळा करण्याचा प्रश्नच नसतो, येथे प्रश्न वेगळाच असतो व तो म्हणजे त्या तपशीलाच्या जंजाळात न अडकता आपल्या जीवनाचे सम्यकरुप ध्यानात घेण्याचा व त्याचे दर्शन घडवून आणण्याचा''.

'प्रत्येक खरेखुरे आत्मचरित्र हे ज्या प्रमाणे ज्या व्यक्तीने ते लिहिलेले असते त्य व्यक्तीचे जीवनचित्र असते. त्याचप्रमाणे अनेक बाबतीत ते तुमचे आमचेही जीवनचित्र असते. आत्मशोध आत्मदर्शन हे जीवनावर असा काही प्रकार टाकू शकते की त्या जीवनातील कितीतरी गुढस्थळे एकदम प्रकाशित होतात व त्यामुळे आपल्याला आपल्या जीवनाचाही अर्थ लावता येऊ लागतो. एका व्यक्तीच्या जीवनासंबंधीचे आपले कुतूहल भागवणे एवढेच कार्य खरेखुरे आत्मचरित्‍ करीत असते. ते आम्हा वाचकांनाही अंतर्मुख बनविते. आत्मशोध् करायला लावते. आपल्या जीवनाचा गंभीरपणे विचार करायला लावते. श्रेष्ठ दर्जाच्या वाड्:मयाच्या ठिकाणी हीच शक्ती असते '

या पार्श्वभूमिवर ' आपुलाचि वाद आपणासी ' वाड्मयीन आत्मचरित्राचे स्वरुप, अभ्यासल्यास आकलनाच्यादिशा स्पष्ट होतील. असे मला वाटते.

**'आपुला चि वाद आपणासी' या विषयी थोडेसे-**

' संत तुकारामांच्या वंशाचा आणि वारशाचा एक अविभाज्य भाग बनलेल्या आणि त्याप्रमाणे वाणी-भूमिका आणि वृती अंगी बाळगणाऱ्या मनोवृत्तीचा व दांभीकतेवर तुटून पडणारा प्रसंगी कठोर बनणारा हा निष्ठावंत कार्यकर्ता जसादिसतो, तसाच एक  अभिजात प्रतिभेचा कलावंत म्हणूनही चंद्रकांत वानखडे यांचे अनुभव 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही नाही जुमानिले बहूमता' याचा प्रत्यय पुन्हा एकदा वाचकांना आणून देणारा भाषिक आविष्कार वानखडे यांनी केला आहे. असे म्हणावे वाटते. यामुळेच की काय आत्मचरित्राचे शीर्षक अन्वर्थक ठरते. ही अन्वर्थकता जपण्याचे काम जाणिवपुर्वक केलेल्याचे कुठेच जाणवत नाही. सहजता आणि स्वाभाविकता हा विशेष त्यांच्या अनुभव समृध्दीला प्राप्त झाल्याचे दिसून येते'

**कथात्मकता :**

आत्मचरित्र हा वाङ्:मयप्रकार कथात्मक असून जीवनाचे अधिकाधिक वास्तवदर्शन घडविणे हा आत्मचरित्र लेखनामागचा हेतू असतो.

'आपुलाचि वाद आपणासी' हे चंद्रकांत वानखडेचे आत्मचरित्र या मध्ये त्यांनी आपल्या जीवनाशी संबध्द असणाऱ्या जीवनाचे सत्यदर्शन स्वाभाविकपणे करण्यास ते पात्र ठरले आहेत का? त्यांच्या आत्मचरित्र लेखनामागील हेतू हा आत्मगौरव किंवा आत्मप्रदर्शन आहे का? का, त्यांनी त्यांच्या जीवनातील घडलेल्या आणि जगतांना आलेल्या प्रत्येक जीवनानुभवांचे सत्यदर्शन घडविणे हा असल्याचे अनुभव कथन केलेल्या स्वरुपावरुन दिसून येते किवा अवास्तवता,अप्रस्तुतता आणि अकारण ओढून ताणून अनुभवाचे दर्शन घडविलेले आढळून येते. याविषयी विदर्याथ्यांना माहिती करुन द्यावी, आकलन करुन द्यावे. या सर्व बाबतीत लेखक खरा उतरलाका नाही याची मीमांसा अभ्यासकाने जरुर करावी, तसे करणे अपरिहार्य ठरत असते.

**प्रामाणिकता :**

चंद्रकांत वानखडे यांनी आपल्या आत्मचरित्रामध्ये जो जीवनपट चित्रीत केला आहे,तो जीवनप्रवास ज्या जीवनमूल्यांनी प्रेरित झाला आहे. त्या जीवनमूल्यांच्या संवर्धनासाठी जी भूमिका घेवून जगतांना दिसतात. त्या विषयीचा त्यांचा त्याग आणि गतिशीलता व त्या प्रवाही व्यक्तीमनाला आलेल्या अनुभवांचे स्वरुप, तत्वमूल्यांशी लेखक कसा प्रामाणिक राहिला आहे. हे अभ्यासकांच्या लक्षात आणून तर द्यावेच त्याशिवाय त्यांनी तत्व आणि व्यवहाराच्या पातळीवर आलेल्या प्रत्येक अनुभवाचे लेखकाने यथार्थ आकलन कसे कले आहे हे आशय आणि अभिव्यक्तीच्या सजिवतेवर अवलंबून कसे आहे हे ही बघावे.

**घटणा,प्रसंग आणि व्यक्तीदर्शन :**

चंद्रकांत वानखडे हा एक चळवळीचा निष्ठावंत कार्यकर्ता आहे. या कार्यकर्त्यांचे हे आत्मचरित्र आहे योच भान सतत वाचकांना असावे लागते. चळवळ आणि निष्ठा ह्या वेगळया असू शकत नाही कारण निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या जोरावरच चळवळीचे अस्तित्व अवलंबुन असते. याचे भान वानखडेनी आणि चळवळीत अन्य व्यक्तींनीकितपत सांभाळले याचे अनेक घटना प्रसंगांच्या

 ©EIJMR All rights reserved.

माध्यमातुन वानखडे यांनी चित्रीत केले आहे. याविषयीचे त्यांना झालेले आकलन आणि त्यांनी लावलेला अन्वयार्थ आशय आणि अभिव्यक्तीतून आलेल्या जिवतंपणे कसे चित्रीत केले आहे. या संबंधीची जाणिव विद्‌यार्थ्यांना करुन देणे हा एक भाग आहे. तसेच अनेक घटना प्रसंगाच्या निमितांने ज्यांचा ज्यांचा सहसंबंध किंवा सहवास लाभला आहे, त्या व्यक्तीच्या वृत्ती-प्रवृत्तीचा, स्वभाव वैशिष्ट्‌यांचा आलेला अनुभव उलगडून कसा दाखविला, त्या अनुभवाचे नेमके स्वरुप कसे आहे हे लक्षात आणुन द्‌यावे.

**चरित्रनिवेदन आणि भाषाशैली :**

'आपुलाचि वाद आपणासी' या आत्मचरित्रातील जिवनचित्र स्वत:लेखक रेखाटत असल्यामुळे अनुभव कथनाची शैली ही प्रथमपुरुषी आहे. आपल्या जीवनाचे चित्र आपण सांगत असल्यामुळे 'आपुलाचि वाद आपणासी' आकाराला आलेले आहे. तत्वनिष्ठ जीवनाला आकार देण्याचे त्यांचे प्रयत्न आणि तो इमान राखत कसा जगतो हे तर महत्वाचे आहेच, परंतु त्याशिवाय निवेदन कसे करतो हे ही तितक अन्वर्थक ठरते. लेखक जसा जीवनाच्या प्रवाही आणि गतिशीलतेला आत्मसात करुन त्यावर कसा स्वार होतो, अन्‌ तितकाच त्या समाजवास्तवाचा अर्थ लावून त्यामधील सत्य जोखतो, माखतो त्याचे स्वरुप आणि अकलन करता-करता त्यांच्या निवेदन आणि भाषाशैलीचा सुंदर समन्वय कसा घालतो हे बघावे. वैचारिक सौंदर्याबरोबर संतवचनाचा सुरेख मेळ, चारित्रकार आपल्या चरित्राला आणि चारित्र्याला समृध्द बनविण्याचा त्याचा प्रयत्न किती स्वाभाविकपणे चाललेला आहे, हे आकलन करुन घ्यावे. जसा जगण्यात आहे तसाच तो अभिव्यक्त कसा आहे हे पाहणे मोठे मजेशीर आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे झाल्यास (शेवटच्यावर पहा.)

''माझ्यातील सिध्दार्थाला फुलण्या-फलण्या-बहरण्याची आकांक्षा आहे. माझ्यातील सिध्दार्थाला बुध्द जरी होता आले नाही, तरी समृध्द जरुर होता आले. हीच समृध्दी माझ्या आयुष्याची 'कमाई' आहे.''

संदर्भ :-

1. प्रा.डॉ.वा.ल.कुलकर्णी -'वाङ्‌:मयीन टीपा आणि टिप्पणी.'
2. चंद्रकांत वानखडे- 'आपुलाचि वाद आपणासी'

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR All rights reserved.